संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अवकळा आणणाऱ्या युद्धाच्या झळा

युद्ध जरी आखाती देशात सुरू असले तरी भारतावर त्याचे अनेक परिणाम दिसू लागले आहेत. प्रामुख्याने इंधन पुरवठ्यावर सर्वाधिक परिणाम झाला असल्याने संपूर्ण देशात मोठी इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. किंबहुना तशी सुरूवात झालेली आहे. तो धोका लक्षात घेऊनच केंद्र सरकारने अत्यावश्यक सेवा, देखभाल कायदा म्हणजेच एस्मा लागू केलेला आहे. केंद्र सरकार कितीही म्हणत असले की आपल्याकडे साठा पुरेसा आहे परंतु युद्धाचा भरोसा नसल्याने खबरदारीच्या उपाययोजना तितक्याच गरजेच्या ठरतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकरच संपेल असे वक्तव्य केले आणि त्याच दिवशी अमेरिकेने इराणच्या मोठ्या जहाजावर हल्ला केला शिवाय इराण आणि इस्त्रायल या दोघांनीही एकमेकांवर जोरदार क्षेपणास्त्र हल्ले केलेले आहेत. सध्या कोणीही माघार घेण्याच्या मनस्थितीत नाही. इराणने युद्धामध्ये केलेली खेळी ही त्या देशाला त्रासदायक जरी ठरणारी असली तरी जगाला वेठीला धरणारी म्हणावी लागते. अमेरिकेला पाठिंबा देणाऱ्या जवळपास दहा आखाती देशांना इराणने टार्गेट केलेले आहे. सौदी अरेबिया, कतार, बहारिन, यासारख्या देशांवरही इराणकडून हल्ले झाले विशेषतः या देशांचे तेलसाठे उद्ध्वस्त करण्याचा इराणकडून प्रयत्न झाला. या मागचा हेतू स्पष्ट आहे की, युद्ध जरी इराण आणि अमेरिका यांच्यातले असले तरी अमेरिकेच्या बाजूने उभ्या राहाणाऱ्या देशांना त्याचे मोठे परिणाम सहन करावे लागतील आणि आता ती परिस्थिती निर्माण झालेली आहे. भारताला जवळपास अन्य दहाच्या दहा आखाती देशातून मोठा इंधन पुरवठा होतो. शिवाय रशियाकडूनही कच्चे तेल उपलब्ध असते. परंतु प्रामुख्याने स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा हा सौदी अरेबिया आणि कतार यासारख्या देशातून होतो. सतत होणाऱ्या हल्ल्यांमुळे या देशांनी बऱ्याच ठिकाणचे गॅस उत्पादन थांबवले आहे. स्वाभाविकपणे भारताला मिळणाऱ्या स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम दिसू लागला.

### एस्मा कायद्याची गरज

देशभरातल्या जवळपास सगळ्या मोठ्या शहरांमधल्या इतर व्यावसायिकांच्या गॅस पुरवठ्यात कपात केलेली आहे. यामागे घरगुती गॅसच्या पुरवठ्यात मोठी अडचण येऊ नये असाच प्रयत्न आहे. सरकारकडून घरगुती गॅस पुरेशा प्रमाणात आहे असल्याचे सांगितले जाते. जरी या परिस्थितीचा गैरफायदा उठवण्याचा प्रयत्न काही गॅस एजन्सीजकडून सुरू आहे. अगदी महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी सिलिंडर मिळवण्यासाठी एजन्सीजच्या बाहेर लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामागे टंचाई होण्याची भीतीच दिसून येते. पुढच्या काळात ज्यांच्याकडे दोन गॅस सिलिंडर आहेत त्यांनादेखील काही काळासाठी एकाच गॅसवर भागवावे लागू शकते. थोडक्यात सरकारने स्वयंपाकाच्या गॅसची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन गॅस सिलिंडरचे रेशनिंग सुरू केलेले स्पष्टपणे दिसून येते. भारतीय कंपन्यांकडून गॅस सिलिंडरचे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु संपूर्ण देशाला पुरवू शकतील एवढी उत्पादन क्षमता त्यांच्याकडे नाही. युद्धाच्या या कठीण प्रसंगातही ज्या देशांबरोबर भारताचे संबंध चांगले आहेत त्यांच्याकडून हा पुरवठा अधिकाधिक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे. मधल्या काळामध्ये घरगुती गॅसचे दर जवळपास ५५ रुपयांनी वाढले आहेत. या किमतीदेखील नियंत्रणात ठेवण्याची कसोटी सरकारला पार पाडावी लागेल. विशेष म्हणजे किमती वाढण्याचीही शक्यता लक्षात घेऊन लोकांवरदेखील गॅसचा वापर मर्यादित करण्याची वेळ आलेली आहे. या युद्धाचे परिणाम इतक्या तीव्रतेने आणि अशा पद्धतीने भारताला सहन करावे लागतील. याची पुरेशी कल्पना आलेली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारताचे ज्या आखाती देशाशी संबंध चांगले आहेत. त्या देशांमध्येही इराणने हल्ले केल्याने भारताची मोठी अडचण झाली. कच्चे तेल असो किंवा स्वयंपाकाचा गॅस असो, याचा बराच साठा भारताला लागत असतो. कच्च्या तेलाच्याबाबतीत ही निर्यात कमी करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. मग अगदी इथेनॉलच्या वापरापासून ते इलेक्ट्रीक किंवा नैसर्गिक वायूवरच्या वाहनांच्या मोठ्या उत्पादनापर्यंत हे प्रयत्न दिसून येतात. परंतु आता युद्धाच्या काळामध्ये म्हणजे ऐनवेळी होणाऱ्या अशा कोणत्याही प्रसंगात हे प्रयत्नदेखील अपुरे ठरतात.

### लग्नसराई कचाट्यात

या सगळ्या युद्धाचा प्रामुख्याने इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने भारतातल्या दैनंदिन जीवनावर त्याचा प्रभाव पडतो आहे. विशेषतः स्वयंपाकाचा गॅस काही प्रमाणात कच्चे तेल आणि अनेक देशांमधील अस्थिर परिस्थिती याचा अर्थकारणावर परिणाम होतो. येणारी लग्नसराई या इंधन कचाट्यात सापडली आहे. देशातील अनेक शहरामध्ये युद्धामुळे लग्नाचे मुहूर्त पुढे ढकलावे लागत आहेत. ज्या लग्नसराईच्या हंगामातून काही लाख कोटींची उलाढाल होते. परंतु या इंधन धोक्याने या उलाढालीवरही मोठे सावट आलेले आहे. मोठ्या हॉटेल व्यावसायिकांचे धाबे तर दणाणले आहेच. कारण आपल्या ग्राहकांना आपण योग्य पद्धतीची सेवा देऊ शकणार नाही हे लक्षात घेऊन मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल्सने बुकिंग बंद केलेले आहे. अतिशय मर्यादित प्रमाणात व्यवसाय करण्याची वेळ येऊ लागली आहे. घरगुती स्तरावर येणारा गॅसचा तुटवडा लक्षात घेऊन इलेक्ट्रीक आधारित साधनांच्या खरेदीही वाढ लागल्याचे चित्र आहे. इंडक्शन यासारख्या प्रकारांची मागणी वाढल्याची बाजारात परिस्थिती आहे. हवाई वाहतुकही चांगलीच अडचणीत सापडलेली दिसून येते. विशेषतः आखाती देशांमधील उड्डाणे तर बंद आहेतच. परंतु युरोपिय देशांना जाणाऱ्या अनेकांनी आपले बेत रद्द केले. परदेशी पर्यटनाला चांगलाच तडाखा बसलेला आहे. म्हणूनच ऐन उन्हाळ्यामध्ये सुरू झालेल्या युद्धाच्या झळा चांगलेच चटके देणाऱ्या ठरत आहेत. परिस्थिती लवकर सुधारावी त्यासाठी जरी प्रयत्न होत असले तरी काळजीपूर्वकच परिस्थिती हाताळणे गरजेचे ठरते.